

श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळाचे

श्रीमती शां. कां. गांधी कला, अमोलक विज्ञान व प. हि. गांधी वाणिज्य महाविद्यालय कडा

ता. आष्टी जिल्हा बीड ४१४२०२

भूगोल विभाग

प्रा. उध्दव एकनाथ चव्हाण
( विद्यावाचस्पती )

# मानवी भूगोल

एस्किमो या आदिम जमाती बाबत अभ्यासास चालना मिळेल........

१) एस्किमो निवास क्षेत्र ओळख.
२) भौगोलिक पर्यावरण.
३) निवास / घर.
४) शारीरिक वैशिष्टये.
५) वस्त्र व शस्त्रे, अन्न,अर्थव्यवस्था/व्यवसाय, शिकार पद्धती.
६) समाजव्यवस्थ व संस्कृती.

# मानवी भूगोल, जागतिक आदिम जमात
# एस्किमो:(Eskimo)




१) **निवास क्षेत्र:** एस्किमो स्वत:ला **‘इनूईत’** (Inuit) या नावाने संबोधतात. ते प्रामुख्याने कॅनडाचा उत्तरेकडील किनारी प्रदेश, बफिन व ईतर बेटं, हाडसन खाडीचा उत्तरेकडील प्रदेस, ग्रीनलँड मधे ६५° ते ७०° उत्तर आक्षवृतीय प्रदेश, पश्चिम किनार्यावर ७६° ते ७९° उत्तर आक्षवृत्ताच्या दरम्यान यांची शुध्द जात शिल्लक आसुन तीला ‘ **धृवीय एस्किमो’** असे म्हणतात. एकुण लोकसंख्या ७०००० आहे.

निवास क्षेत्र: एस्किमो








२) **भौगोलिक पर्यावरण:** खडकाचा किनारी प्रदेश, भूपृष्ठ बर्फाने आच्छादलेले, मातीचा थर पातळ व गोठलेला, हवामान अतिथंड व विषम, दिर्घ हिवाळा, अल्प उन्हाळा, ९ महिने कडाक्याची थंडी, तापमान -४६° सें. ते -२४° सें. उन्हाळयात तपमान १०°सें. सोसाट्याचे वारे, वेग दर तासी १०० ते १५० किमी. बर्फाचे वादळं, पाऊस बर्फाच्या

स्वरूपात, हवामान वनस्पती वाढीस अनकुल नाही, वनस्पतीचा अभाव, शेवाळ, दगडी शेवाळ, लिचेन्स व दांडेलीयन्स सारखी फुले, व झुडपे, प्राणी जीवन मर्यादित, रेनडियर मुख्य प्राणी, कॅरिबु, कोल्हे, ससे, कुत्रे, तर सील व वालरस मासे.



३) **निवास / घर:** हिवाळ्यात बर्फाचं घर **'इग्लू'** उन्हाळ्यात हाडे, कातडी व दगड या पासुन तंबूला **'ट्युपिक'** म्हणतात. घराचा व्यास चार मिटर व उंची तीन मिटर, रेनडिअर च्या चरबीचा दिवा, हिवाळ्यात नऊ महिने घरात बसून राहतात.





४) **शारीरिक वैशिष्टये:** उंची ४.४ फूट ते ५.२ फूट, चेहरा सपाट व रूंद, नाक चपटे, डोळे काळे व तपकिरी, केस काळे, डोके लांब, रंग फिकट पिवळसर, **मंगोलाईड वंश**, मुळ स्थान आशिया, कॅनडात कॉकेसाईडचे मिश्रण.



५) **वस्त्र व शस्त्रे:** वस्त्रे कॅरिबूच्या कातडी पासून, कातडीचे पायघोळ अंगरखे, **‘निमियाक’** नावाचा कातडी झगा, **‘कांमिक’** कातडी बुट वापरतात, ‘वालरस’च्या दातांपासुन बनवलेले चष्मे वापरतात. मुख्य शस्त्रे धनुष्यबाण व भाला, सील मासा व रेनडियरच्या हाडापासुन बनवतात, सील माशाची शिकारीसाठी **‘हार्पुन’** हे शस्त्र वापरतात. रेनडियर च्या हाडा पासून बिनचाकी गाडीला **‘स्लेज’** म्हणतात. तीला कुत्री ओढतात. समुद्रात






मासेमारीसाठी सील व वालरस माशांच्या हडांपासुन किंवा लाकडी सांगाड्यावर कातडी चढवुन होडी तयार करतात तीला **“कयाक”** म्हणतात.



६) **अन्न:** एस्किमो या शब्दाचा अर्थ **"कच्चे मांस खाणारा"** , त्यांचे मुख्य अन्न मांस आहे. सील, वालरस, कॅरिबू, धृवीय अस्वल, व्हेल, रेनडिअर यांचे मांस ऊन्हाळयात शिकार करतात व हिवाळयासाठी साठवुन ठेवतात.

७) **अर्थव्यवस्था/व्यवसाय:** प्रतिकुल हवामान, मर्यादित प्राणी व मासे , या मर्यादित संसाधनावर उदरनिर्वाह करावा लागतो. त्यामुळे ऊन्हाळयात शिकार करने हाच त्यांचा महत्वाचा मुख्य व्यवसाय आहे.

८) **प्रतीक्षा शिकार पद्धती:** शिकार वेगवेगळया ऋतूत वेगवेगळी असते. हिवाळयाच्या सरूवातीला समुद्रकिनारयाजवळ एकत्रित येतात. येथे मार्च-एप्रिल पर्यंत वस्ती करतात. हिवाळयात फक्त सील माशांची शिकार करतात. त्यापासुन अन्न, वस्त्र, शस्त्रे, भांडी व प्रकाशासाठी दिवा, चरबी वापरतात. सील मासे श्वासोच्छवास करण्यासाठी बर्फात छिद्रे पाडतात. कुत्री अशी छिद्रे शोधुन काढतात. त्या छिद्रात हाड ठेवुन ते हालले की मासा आल्याची सुचना मिळते. तेथे हार्पुन जोरात खुपसतात व शिकार करतात. यासाठी खुप वेळ बसुन रहावे लागते, शिकारीच्या या क्रियेला **"माऊपोक"** म्हणजे प्रतिक्षा करणे असे म्हणतात. **"माऊपोक" "इतुआरपोक"** व **"उटोक"** ईत्यादी शिकार करण्याच्या पद्धती आहेत.



९) **समाजव्यवस्थ व संस्कृती:** एस्किमो स्वतंत्रपणे किंवा गटागटाने राहतात. स्त्री-पुरुष शिकार करतात. घरातील सर्व कामे स्त्रीया करतात. संस्कृती पुरुषप्रधान आहे. विवाहा बाबत समानाधिकार, एक विवाहाची पद्धती, एकपेक्षा जास्त विवाहास मनाई नाही. विवाहानंतर बहूदा मुलगा मुलीच्या घरी नांदायला जातो. एस्किमो सांस्कृतीक दृष्ट्या

मागासलेले आहेत. आरोग्याच्या नियमांचे पालन करत नसल्याने अल्पायुषी आहेत. चालीरीती, धार्मिक कर्मकांडला महत्वाचे स्थान आहे. **"सेदना"** नावाच्या देवीचे निसर्गावर नियंत्रण असते असे एस्किमो मानतात. जीवनक्रम अत्यंत कठीण व प्रतिकुल परिस्थितीत, नैसर्गिक पर्यावरणासी मिळतेजुळते घेतात.

*******